# आर्थिक विकासाचे गांधीवादी प्रतिमान

**डॉ. गजानन शिवहरी जाणे**
सहाय्यक प्राध्यापक
सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महा.
पुलगाव
Email Id - gsjane1812@gmail.com

---

**सारांश :**

*महात्मा गांधी यांनी मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असलेल्या शहरातील करोडो लोकांना येणाऱ्या अडचणीविषयी इशारा दिला होता की, वाढत्या शहरीकरणामुळे वस्ती आणि झोपडपट्टी यातील वाढती लोकसंख्या शहरातील गरीब आणि श्रीमंती यातील दरी वाढत जाते. त्यामुळे शहरात याचा परिणाम गुन्हेगारी, हिंसाचार, शोषण व प्रदुषणामुळे पर्यावरण हानी या बाबी शहरात नित्याच्या झालेल्या दिसून येते. त्यामुळे प्रत्येक गाव जर आत्मनिर्भर झाले तर या समस्यावर मात करता येते. तसेच उद्योगाचे केंद्रीकरण त्यांना मान्य नव्हते. भांडवल प्रधान संस्कृतीपेक्षा श्रमप्रधान उत्पादन प्रणलीवर त्यांचा अधिक भर होता. गांधीजींनी विश्वस्ताची संकल्पना कोणत्याही उद्योग मालकाला आपल्या उत्पादन साधनाचा दुरुपयोग करण्याची अनुमती देत नाही. त्यांनी स्वदेशीला अधिक महत्व दिले आहे. ते आत्मनिर्भर अर्थव्यवस्था बनविण्याचे प्रभावी साधन आहे असे त्यांचे मत आहे. स्थानिक पातळीवर उद्योगाचे पुनर्निर्माण करुन ग्रामीण लोक त्यांच्या गरजांची पुर्तता करेल. गांधीवादी अर्थव्यवस्थेत लघू व कुटीर उद्योगाचे महत्व त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यातुन बेरोजगारी, गरिबी व असमानता संपविणे शक्य आहे. त्यासाठी त्यांनी सर्वाेदय या तत्वाला महत्व दिले. गांधीजीने निरनिराळ्या अर्थशास्त्रज्ञांची प्रगती व विकास याची सुत्रे मांडली व त्यातून अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणणे शक्य आहे असे त्यांचे मत होते. राज्याच्या भूमिकेबाबत बोलताना गांधीजी असे म्हणतात की, राजनिती शक्तीचा अर्थ असा आहे की राज्यात लोकांद्वारे निवड झालेल्या लोकप्रतिनिधीने लोकहितासाठी घेतलेले निर्णय हे राजनैतिक शक्तीची क्षमता दर्शविते. सत्तेचे केंद्रीकरण त्याच्यासाठी पाप आणि हिंसा होते यासाठी गांधीजी अहिंसा आणि सत्तेचे विकेंद्रीकरण यावर आधारीत लोकतांत्रिक सरकारची गरज आहे याचे ते प्रोत्साहक होते. त्यांच्या मते राज्यामध्ये व्यक्ती सर्वोच्च असेल आणि राज्यकर्ते हे सेवक राहिल यालाच गांधीजींनी रामराज्याचे नाव दिले होते. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून आज आर्थिक विकास प्रक्रियेत येणाऱ्या रोजगारात वाढ, जातीविरहित, वर्गविरहित अर्थव्यवस्था निर्माण करुन संतुलित आर्थिक विकास साधता येऊ शकतो काय त्याचा किती प्रभाव पडतो त्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनात गांधीवादी आर्थिक प्रतिमानाचे तत्व अंगीकरणाचा प्रयत्न केला आहे.*

**बिज संज्ञा :** विकेंद्रीकरण, भांडवल उत्पादन पध्दती, स्वदेशी, सर्वोदय, आत्मनिर्भरता प्रगती आणि विकास.

---

**प्रस्तावना :**

गांधीवादी अर्थव्यवस्था साधेपणा, विकेंद्रीकरण, आत्मनिर्भरता, सहयोग, समानता, अहिंसा, मानवी मूल्य, आत्मनिर्भर ग्रामसंस्था आणि मूलभूत उद्योगाचे राष्ट्रीयकरण, स्वदेशी आणि विश्वस्ताच्या सिध्दांतावर आधारीत

आहेत. या बदल्यात श्रम, भांडवल, उत्पादन, वितरण आणि लाभ यासारख्या समस्यांचे समाधान करते. 1991 पासून आपण बाजार उन्मुख खुल्या आर्थिक प्रणालीचा वापर करीत आहे. परंतु अजुनही जुन्या समस्याचे समाधान करणे शिल्लक आहे. तसेच उच्च विकासदर गाठणे बाकी आहे. त्यासाठी आपल्याला वर्तमान काळातील आर्थिक समस्याचा शोध घेण्याची तात्काळ आवश्यकता आहे. गुन्मार मिर्डल आणि अन्य अर्थशास्त्रज्ञांचे असे मत आहे की, भारत आणि अन्य विकसनशील देशात सामाजिक, आर्थिक समस्या सोडविण्यासाठी गांधीजीने दिलेल्या दिशा निर्देशाचे पालन केले तर काही प्रमाणात त्याचे निवारण करणे शक्य आहे.

महात्मा गांधी यांनी सादर केलेल्या आर्थिक विकासाचे गांधीवादी प्रतिमान (मॉडल) हे उद्योगाचे विकेंद्रीकरण व्हावे कारण उद्योगाचे केंद्रीकरण हे अनेक समस्यांना जन्म देते यात शोषण, बेरोजगारी, श्रमाचा कमी वापर, दारिद्र्य आर्थिक विषमता वाढीस लागते. त्यामुळे अर्थव्यवस्था आत्मनिर्भर राहू शकत नाही. त्यांनी स्वावलंबन तत्वाचा अंगिकार करुन प्रत्येकाने स्वावलंबी राहिले तर प्रत्येक गाव त्याच्या गरजेच्या वस्तू निर्माण करेल त्यातून त्यांना रोजगार मिळेल व गावातील उत्पन्न गावात राहिल. शहरी व ग्रामीण उत्पन्न विषमता त्यामुळे कमी करता येईल. गांधीजींनी स्वदेशीला महत्व देऊन स्वदेशी वस्तू स्वत: देशात निर्माण करुन त्याचा वापर करावा व त्याची निर्यात करावी त्यामुळे देश स्वावलंबी बनेल व लोकांना कामे मिळतील. जमीन क्षेत्र स्वावलंबी बनेल व स्वदेशी हा एक विचार गांधीजीच्या आत्मनिर्भर अर्थव्यवस्थेचा आधार आहे. शोषण मुक्त समाजाची ती धारणा आहे. सर्वोदयची संकल्पना मांडून गांधीजींनी शोषण विरहित, जातीविरहित, वर्गविरहित अर्थव्यवस्था राहून तिचा संतुलित आर्थिक विकास होईल अशी अपेक्षा केली. त्याच्यामते न्याय, समता आणि नवीन सामाजिक संरचना हे सर्वोदयाचे महत्त्वपूर्ण पैलू आहे. राज्यकर्ते केवळ शासक असून त्यांनी घेतलेल्या निर्णयावर अर्थव्यवस्थेचा विकास संभवतो. तर त्या देशातील जनता ही सर्वोच्चस्थानी राहते अशी त्यांची विचारधारा आहे. प्रस्तुत संशोधन लिखाणात सध्याच्या परिस्थितीत निर्माण होणाऱ्या समस्यावर मात करण्यासाठी गांधीवादी आर्थिक विकासाचे प्रतिमान (मॉडल) कितपत आर्थिक, सामाजिक समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त ठरते यावर भर देण्यात आला आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश :**

1. वर्तमान काळातील अर्थव्यवस्थांना एक पर्यायी स्वरुपात आत्मनिर्भर ग्रामीण अर्थव्यवस्थाच्या प्रयोगाची संभावना कितपत यशस्वी ठरु शकते याचा शोध घेणे.
2. 21 व्या शतकात आत्मनिर्भर ग्रामीण अर्थव्यवस्था बनविण्यासाठी गांधीवादी मॉडलच्या वापराबाबत पडताळणी करणे.
3. आत्मनिर्भर ग्रामीण अर्थव्यवस्था आणि संतुलीत आर्थिक विकास यामधील संबंधाचा शोध घेणे.
4. संतुलित आर्थिक विकासासाठी वैकल्पीक मॉडलची सूचना करणे.

गांधीवादी विचार आज सुध्दा हुबेहुब लागू पडते याचे कारण राष्ट्रीयकरण आणि खाजगीकरण हे दोन्ही क्षेत्र गरिबी, बेरोजगारी, असमानता, पर्यावरण, प्रदुषण, हानी या सारख्याचे निवारण करण्यात असफल झालेले दिसून येते. विज्ञान औद्योगिक तंत्रज्ञान यावर आधारीत विकास कार्यक्रम भौतिक केंद्रीत आहे नाही मानव विकास केंद्रीत आहे. त्यामुळे आपण सर्व समस्याचे समाधान करण्यासाठी गांधीवादी आत्मनिर्भर ग्रामीण आर्थिक मॉडल / प्रतिमानच्या संदर्भात पुनर्विचार करण्याची गरज आहे.

प्रस्तुत शोध निबंधात गांधीवादी आर्थिक विकास प्रतिमानाचा अभ्यास खालील मुद्यांच्या आधारे

करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**1) आत्मनिर्भर ग्रामीण अर्थव्यवस्था :**

महात्मा गांधी यांनी मोठ्या प्रमाणात लोकसंख्या असलेल्या शहरातील करोडो लोकांना येणाऱ्या समस्याविषयी इशारा दिला होता की शहरीकरणामुळे वस्ती आणि झोपड्या यातील वाढती लोकसंख्या शहरातील गरीब आणि श्रीमंत यामध्ये वाढत्या असमानतेमुळे एक असा परिणाम झाला आहे की शहरात गुन्हेगारी, हिंसाचार, शोषण प्रदुषण यासारख्या बाबी शहरी जिवनात नित्यनियमित घडून येताना दिसून येतात. त्यासाठी गांधीवादी विचार आचरणात आणले तर प्रत्येक गाव आपल्या आवश्यकताला पूर्ण करुन त्याचा उपयोग करुन शहरी गरजा पूर्ण करण्यासाठी सुध्दा योगदान देऊ शकते. त्यासाठी प्रत्येक गाव सक्षम करणे आवश्यक आहे जे आपले योगदान देण्यासाठी जे एक निश्चित प्रमाणात उत्पादन करुन आपले योगदान देतील.

**2) विकेंद्रीकरण :**

गांधीजी उद्योगाच्या केंद्रीकरणामुळे निर्माण होणाऱ्या समस्याचे समाधान करण्यासाठी लहान प्रमाणावर विकेंद्रीकरण आणि सहकारी संगठन ठेवण्यावर विश्वास ठेवत असे. ग्रामीण क्षेत्रातील कुटीर आणि ग्रामीण उद्योगाच्या विकासाच्या माध्यमातून आर्थिक शक्तीच्या केंद्रीकरणाला संपविण्याचा विकेंद्रीकरण हे एक साधन आहे असे ते मानत असत. त्यांना मोठ्या प्रमाणात औद्योगिकरण व विकास यातून उत्पन्न होणाऱ्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ, धन आणि विषमता याच्या ते विरोधात होते. विकासाच्या प्रत्येक पायरीवर लोक सामाजिक न्याय मिळविण्याबरोबर विकासाचे फळ याचा आनंद घेऊ शकतात. सगळ्यांना आपल्या क्षमताचा विस्तार पूर्ण स्वातंत्र्याचा आनंद घेण्याची समान संधी मिळते.

**3) भांडवल उत्पादन पध्दती :**

गांधीजीच्या मतानुसार उत्पादनाला विभिन्न श्रेणीमध्ये विभाजित करण्याचे वर्तमानकालीन उपाय हिसंक आहे. कारण यानुसार एका उद्योगाला त्याच्या क्षमतेनुसार हिस्सा दिला जातो त्यामुळे उत्पन्न असमानतेला प्रोत्साहन मिळते आणि उत्पादनाच्या लहान एककांना ज्या कमी कुशल आहे त्यांना उत्पन्नाचा कमी हिस्सा मिळतो. त्यामुळे एक व्यक्ती वैभव व विकास प्रवृत्तीने जिवन जगतो तर दुसरा उपाशी राहतो हा उत्पन्न वितरणाचा प्रकार हिंसक आहे. त्याला अहिंसक स्वरुपात बदलावे लागते. ज्यामध्ये उत्पन्नात असमानता राहणार नाही, उद्योगात मोठ्या प्रमाणातील यंत्राच्या वापरावर विरोध करताना गांधीजी म्हणतात की, मी समाजाच्या किंमतीवर काही लोकांना समृध्द होऊ देऊ इच्छित नाही. त्यांच्या मते वर्तमानकाळात यंत्राच्या वापरामुळे लहान व अल्पसंख्याक अशा कामगार जनतेचे शोषण करुन मोठे उद्योग जिवन जगतात.

महात्मा गांधीनी सकारात्मक स्वरुपात म्हटले आहे की, मला असे वाटते की संपत्तीचे केंद्रीकरण काही लोकांच्या हातात न होता सर्वांच्या हातात झाले पाहिजे. आज यंत्राचा वापर काही लोकांनाच समृध्द बनवित आहे.

**4) गांधीजीचा दृष्टिकोन :**

ग्रामीण भारतात आज जी मोठ्या प्रमाणात गरिबी, बेरोजगारी आणि अपूर्ण रोजगार यासारख्या समस्याचे तात्काळ निवारण करण्यासाठी आणि भारताला आत्मनिर्भर बनविण्यासाठी त्यांच्या सामाजिक व आर्थिक योजना पुर्णत्वास आणण्यासाठी स्पष्ट वैकल्पिक उत्पादन आणि उत्पादन कार्यात श्रमाचा वापर करणे गरजेचे आहे.ग्रामीण उद्योग ग्रामीण क्षेत्रात विस्तारीत केले पाहिजे याचे कारण शहरी उद्योग हे खाजगी उद्योग असतात. त्यामुळे ते ग्रामीण

उद्योगासोबत स्पर्धा करणार नाही आणि मोठे पायाभूत उद्योग आणि राष्ट्रीय स्तरावरील महत्वपूर्ण उद्योग राज्याच्या नियंत्रणाखाली ना लाभ ना तोटा या आधारावर चालविले जातील. छोटे आणि मोठे उद्योग एक दुसऱ्याला पुरक म्हणून चालविले जातील अशारितीने गांधीवादी पर्याय ग्रामीण उद्योगात जनतेद्वारा स्वयंरोजगारच्या माध्यमातून होणाऱ्या उत्पादनाला प्राधान्य देते.

**5) विश्वस्ताची भूमिका :**

भांडवलवादी व्यवस्थेच्या विरुध्द विश्वस्ताची गांधीजीची संकल्पना अशी आहे की कोणत्याही मालकाला आपल्या संपत्तीचा दुरुपयोग करण्याची अनुमती देत नाही तो केवळ त्याला जिवन जगण्यासाठी जेवढे उत्पन्न आवश्यक आहे तेवढ्याच उत्पन्नाचा किंवा संपत्तीचा मालक राहतो व हे त्याला राज्याअंतर्गत निर्धारीत केले जाते आणखी एक गांधीवादी आर्थिक व्यवस्था योजनावर अंकुश लावते आणि दुसरीकडे वर्तमानकाळात व्यक्तीला अहिंसा व श्रमाला अधिक महत्व देते. व्यक्तीला सभ्यतेकडे नेऊन मानवी दु:खाला कमी करते. गांधीजीचे असे मत होते की, ज्या श्रीमंत व्यक्तीने अत्याधिक संपत्ती मिळविली आहे त्यानी त्याला इतर समाजामध्ये त्याच्या कल्याणासाठी वितरीत केले पाहिजे याचे कारण संपत्ती ही संपूर्ण समाजाची आहे. त्यामुळे श्रीमंत व्यक्तीने स्वत:ला विश्वस्त मानले पाहिजे अशी त्यांची धारणा होती. हे करताना त्यांच्याद्वारे कोणत्याही बलशाली शक्तीचा वापर होता कामा नये. विश्वस्ताच्या आज्ञेनुसार व सहमतीनुसारच त्याच्या संपत्तीचा उचीत वापर व्हावयास हवा.

**6) स्वदेशी हा एक पर्याय :**

गांधीजीच्या मते सर्वसामान्याच्या हिताच्या रक्षणासाठी स्वदेशीचा वापर होणे गरजेचे आहे. ते एक चिंतन आहे. देशात पुढारलेल्या वर्गात विदेशी वस्तुचे आकर्षण अधिक आहे त्याला सीमा नाही त्याचे हे स्टेटस प्रतिक बनलेले आहे. परंतु हा विचार योग्य नाही. कारण तो विचार देशाची प्रगती आणि विकासात अडथळा निर्माण करतो. त्यांच्या मते त्यामुळे आपण आपले माणूसपण किंवा स्वातंत्र्य गमावून पुन्हा गुलाम राहतो. त्यासाठी आपल्याला स्वदेशीची भावना पुनर्जिवित करावी लागेल तसेच भारतीय वस्तू, भारतीय साधन सामुग्रीचा उपयोग करण्यावर भर द्यावा लागेल. तसेच स्वदेशी उद्योगाचे आधुनिकीकरण करावे लागेल यावर त्यांचा भर होता. आत्मनिर्भर अर्थव्यवस्था विकसित करण्यासाठी स्वदेशीचा उपभोग आवश्यक आहे. स्वदेशी वस्तुच्या सकारात्मकपणे वापर करणे हे आपल्या देशाची अर्थव्यवस्था आत्मनिर्भर, पुनर्निर्माण करण्यासाठी एक आधारस्तंभ आहे. स्वदेशीचा सिध्दांत संकुचित आणि क्षेत्रीय विचारांवर आधारीत नाही. जर सर्व लोकांनी स्थानिक उत्पादित वस्तुचा उपयोग केला तर जगात उत्पादन होणाऱ्या सर्व वस्तुचा स्थानिक पातळीवर उपयोग केला जाईल. डॉ. भोले एल. एम. यांच्यानुसार स्वदेशी राजनितिक, आर्थिक, प्रशासनीक आाणि तांत्रिक बाबतीत विकेंद्रीकरण आणि विविधता यावर भर देते. यासाठी अन्य गोष्टी शिवाय सरळ श्रमप्रधान, अहिंसक मानवी, लहान प्रमाणावर विकेंद्रीत, स्वदेशी, स्थानिक उद्योगाचा विकास आणि त्याचा उपयोग करणे या गोष्टीची आवश्यकता आहे. ज्याकरिता आंतरराष्ट्रीय उद्योगाचे हस्तांतरण करण्याची गरज पडत नाही याचे कारण आधुनिक विकास बेरोजगारी सारख्या समस्या सोडविण्यासाठी परिपूर्ण नाही. लहान प्रमाणावरील आर्थिक गतिमानता या विनाश झाल्यानेच अल्परोजगार आणि हंगामी बेरोजगारी यासारख्या समस्या अधिक गंभीर होत चालल्या आहे. त्याकरिता स्वदेशीचा वापर आवश्यक असून त्यामुळे आपल्याला उत्पादन मात्रा आणि गुणवत्ता या दोन्ही घटकात योग्य संबंध राखून बेरोजगारी आणि अल्प बेरोजगारी या सारख्या समस्याचे निवारण करणे शक्य होते यावर त्यांचा विश्वास आहे.

**7) सर्वोदय :**

गांधीवादी आर्थिक व्यवस्थेत मानव विकासाचे अंतिम लक्ष्य प्राप्त करण्यासाठी दोन पैलू आहे. पहिला पैलू राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होणे हा आहे आणि दुसरा पैलू गाव आणि लघु व कुटीर उद्योग यांच्या पुनर्विकासाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भरता मूलभूत गरजाची पुर्तता करण्यासाठी प्रत्येक कुटुंबाला उत्पन्नाचा एक न्युनतम स्तर निर्धारीत होणे आवश्यक आहे. यासाठी विकासाच्या पहिल्या टप्पा स्वराज राजनितिक स्वातंत्र्याबरोबर आर्थिक सुरक्षा आणि स्वतंत्रता निर्धारीत करते. विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात चांगले जिवनमान आणि सर्वांच्या विकासासाठी सर्वोदयाद्वारे एक उच्च टप्पा आहे. याच विचारधारेला अनुसरुन जयप्रकाश नारायण सर्वोदयाच्या बाबतीत लिहितात की, आपल्याला जे वाटते की आपण अशा एका समाजाची स्थापना करु की ज्यामध्ये कोणाचेच शोषण होणार नाही त्यात पूर्ण समानता राहिल आणि प्रत्येक व्यक्तीला आपला विकास करण्यासाठी समान संधी मिळेल त्यांनी पुढे म्हटले सर्वोदयचा उद्देश बलहीन, जातिहीन आणि शोषणहीन समाज स्थापित होईल.

सर्वोदय ना काल्पनिक आहे नाही आदर्शवादी आहे हे एक व्यावहारीक तत्व आहे याचा व्यवहारात आपण प्रत्यक्ष उपयोग करु शकतो. त्याचा उद्देश समाजातील असमानता कमी करणे आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक मानवाप्रती मित्रता, सन्मान, सहानुभूती सर्वोदयचा उत्तम मार्ग आहे. सर्वोदयमुळे एक असा समाज निर्माण होतो की, जो जातिविहिन, वर्गविहिन आणि शोषणमुक्त राहिल ज्यात प्रत्येक व्यक्ती आणि समुदाय यांना आपल्या सर्वांगिण विकासाची संभावना राहते. सत्य आणि अहिंसेमुळे त्यांना सहज संभव बनविणे शक्य आहे. सर्वोदय नुसार केवळ भौतिक प्रगती पर्याप्त नाही तर मनुष्याला आध्यात्मिक प्रगती सुध्दा करणे गरजेचे आहे. सामाजिक न्याय, समानता आणि नवीन सामाजिक संरचना सर्वोदयाचे महत्वपूर्ण पैलू आहे. या संदर्भात न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी म्हटले आहे की, न्यायाची संकल्पना मुळत: नैतिक आणि मानवीय असू शकते कारण मनुष्याला जिवन जगण्याचा जन्मसिध्द अधिकार आहे आणि तोही सन्मानाने जगू शकतो याचे कारण अपमानीत जिवन जगणे मानवीय जिवन असू शकत नाही असे त्यांचे मत होते. यासाठी आपल्याला सामाजिक संरचना बदलावी लागेल जी जिवनाच्या सर्व क्षेत्रात न्याय निश्चित करेल. याकरिता महात्मा गांधीनी शतप्रतिशत स्वदेशीला प्राधान्य क्रम दिला होता त्यांनी या बाबतीत सात अनुचित आणि घटनाचा उल्लेख केला होता.

न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी म्हणतात की, विज्ञानाच्या प्रगतीमुळे आज निशंक जिवन रक्षण करणारी औषधी आणि संसाधनाची नवीन नवीन उपलब्धता निर्माण केली आहे त्यामुळे मनुष्याचे आयुर्मान वाढले आहे असे असले तरी जिवन रक्षण करणारी औषधी आणि उपकरणे यापेक्षा अधिक जीव घेणारी, हत्या करणारी हत्यार निर्माण झाले आहे त्यामुळे अहिंसा हे एक असे सामाजिक मूल्य आहे की जे कधीही काहीही कारणाशिवाय कोणत्या मित्राची हत्या करीत नाही. यासाठी विनोबा भावे यांनी एक समीकरण तयार केले होते. ते असे विज्ञान+हिंसा = संपूर्ण विनाश. दुसरे विज्ञान + अहिंसा = सर्वोदय कदाचित या समीकरणाला सर्वमान कालीन परिस्थितीत लागू केले तर त्यावरुन ही बाब स्पष्ट होते. सर्वोदय आधुनिक समाजासाठी किती मोठी आणि खरी वस्तुस्थिती आहे. काही लोकांना सर्वोदय ही एक काल्पनिक संकल्पना वाटते परंतु डॉ. इंदू टिकेकर यांनी विभिन्न तार्कीक मुद्यावर आधारीत खंडन करुन त्यांनी असे मत मांडले की सर्वोदय नंतर जो वर्गहीन आणि शोषणमुक्त समाज निर्माण होईल त्याला कल्पनामध्ये समावेश असलेली संकल्पना म्हटली जाणार नाही.

**8) प्रगती आाणि विकास :**

विकासाची गांधीवादी संकल्पना अधिक व्यापक आहे. ज्यात ना केवळ आर्थिक विकासच नाही तर सामाजिक आणि मानवी विकासाचा समावेश आहे. सर्वांच्या मानव कल्याणाशिवाय आर्थिक विकास कोणत्याच प्रकारे विकास होऊ शकत नाही आणि त्यासाठी विकासाच्या गांधीवादी संकल्पनेला याप्रकारे सुत्रानुसार व्यक्त केले जाते

विकास = आर्थिक वृध्दी + सर्वोदय

या बाबतीत गांधीजीचे असे मत होते की, मानव संसाधन हे नियोजन आणि धोरणामध्ये केंद्रस्थानी असले पाहिजे त्यांच्या मते असे कोणतेही धोरण जे केवळ कच्चा मालाचा उपयोग करते आणि शक्तीशाली अशा मानव संसाधनाकडे दुर्लक्ष करते हे केवळ नाशाचे लक्षण आहे याने मानव समाजात समानता प्रस्थापित होऊ शकत नाही. गांधीजीची विकासाची संकल्पना देशातील सर्व लोकाच्या मूलभूत गरजाच्या पुर्ततेवर आधारीत आहे. त्यांच्या मते जोपर्यंत देशातील गरिबी आणि बेरोजगारी यासारख्या समस्याचे निवारण होत नाही तोपर्यंत गांधीजी हे मानन्यास तयार नाही की वास्तविकपणे देशाने समृध्दी आणि स्वातंत्र्य प्राप्त केले आहे. गांधीजीकरिता खरी संपत्ती आभूषण आणि पैसे हे नाही तर आपल्या सर्वांना चांगले भोजन, कपडे, शिक्षण आणि आरोग्य आहे अशी स्थिती प्रदान करणे आहे. त्यांच्यामते एक देश तेव्हाच स्वतंत्र आणि समृध्द समजला जातो जेव्हा त्या देशातील प्रत्येक नागरिक आपल्या गरजा पूर्ण करण्याइतके उत्पन्न सहज प्राप्त करु शकतो.

गांधीवादी कार्यक्रम विकासाचे तीन टप्पे दाखवितो. ग्रामीण विकासाचा पहिला टप्पा आहे. त्यात ग्रामीण विकासाचा उद्देश ग्रामीण उद्योग आणि हस्तशिल्प (खादी) च्या विकासातून गावाचे पुनर्निर्माण करणे ज्यामुळे गावात अधिक रोजगार आणि उत्पन्न प्राप्त होईल. या मागाचा मुळ विचार असा की त्यामुळे गावांना आत्मनिर्भर व स्वावलंबी बनविणे हा आहे. याचे कारण गांधीजी प्रत्येक गोष्टीत आत्मनिर्भरता (स्वावलंबन) लक्षात घेत होते.

स्वराज्यप्रमाणे विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात निवडणूकीच्या माध्यमातून स्वराज्य प्राप्त करु इच्छित होते. या टप्प्यामागे उद्देश हा होता की विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून शहर आणि गाव यामध्ये असणारा वाद किंवा स्पर्धा समाप्त करणे हा होता. या टप्प्यात मजुर उत्पादनाचे साधन प्राप्त करेल आणि अंतिम राज्यात सर्वोदय म्हणजे त्याची शारीरिक मूलभूत गरजाची पुर्तता केली जाईल आणि शरीर मन आणि आत्मा याच्या विकासाकरिता पर्याप्त संधी प्राप्त होतील. गांधीजीचे विकास प्रतिमान संतुलित विकासाच्या सिध्दांतावर आधारीत आहे आणि हा टप्पा सर्वच संतुलित विकासाचा टप्पा असेल असे त्यांचे मत होते.

**राज्याची भूमिका :**

गांधीजीच्या मते, राजनैतिक शक्तीचा अर्थ असा आहे की, राष्ट्र जिवनाला त्याच्या वास्तविक स्वरुपात निवड केलेल्या प्रतिनिधीच्या माध्यमातून घेतलेल्या निर्णयाच्या क्षमतेवर आधारीत आहे. वेळेच्या सोबत अशी अपेक्षा केली जाते की, राष्ट्रीय जिवन एवढे परिपूर्ण होईल की ते स्वंय नियमित होऊन जाईल. परंतु जोपर्यंत राज्य विहिनताची पूर्ण स्थिती येणार नाही जसे की गांधीजीनी सांगितल्याप्रमाणे अहिंसा आणि विकेंद्रीकरणाच्या आधारावर राजनैतिक व्यवस्थेचे सध्या पुनर्गठन केले गेले पाहिजे. गांधीजी सरकारला कोणतीही भूमिका सांगायच्या विरोधात होते. त्यांचे मत असे होते की, समाज केवळ तेव्हाच न्यायपूर्ण राहिल जेव्हा तो जातिविहिन व वर्गविहिन राहिल तसेच तेव्हाही राहिल जेव्हा तो राज्यविहिन राहिल. त्यांनी असे म्हटले होते की मी राज्याच्या शक्तीत वाढ

होताना सगळ्यात भितिच्या दृष्टीने पाहतो कारण शोषण कमी करुन चांगले करण्यासोबत या युक्तीवादाला नष्ट करुन मानव जातीला अधिक हानी पोहचविती जो सर्व प्रगतीचा मूळ आहे. सत्तेचे केंद्रीकरण त्यांच्यासाठी पाप आणि हिंसा होते. याकरिता गांधी अहिंसा आणि सत्तेचे विकेंद्रीकरण यावर आधारीत लोकतांत्रिक सरकारची गरज आहे. याचे ते चाहते होते जिथे व्यक्ती सर्वोच्च असेल आणि राज्य केवळ त्याचा सेवक असेल यालाच गांधीजींनी रामराज्याचे नाव दिले होते.

**निष्कर्ष :**

1. समकाळातील समस्यांना लक्षात घेतले तर असे दिसून येते की, अधिकांश भांडवलदार शहर आणि मोठ्या उदयोन्मुख आर्थिक धोरणामुळे निर्माण झाले आहे.
2. आर्थिक सुधारणाच्या कार्यक्रमानंतर सुध्दा त्यात विशेष बदल झालेला दिसून येत नाही. ज्यामुळे आज विकसनशील देश आर्थिक समस्यांचा सामना करताना दिसून येत आहे.
3. आर्थिक सुधारणा कार्यक्रमाच्या अपयशानंतर विकसनशील देशांना एक पर्याय शोधण्यासाठी हताश केले आहे. ज्यासाठी गांधीवादी आर्थिक व्यवस्था सर्वात यशस्वी पर्याय समाजला जातो. जगातील कोणत्याही देशाने सामाजिक आर्थिक सुधारणा करताना या पर्यायाचा म्हणजे गांधीवादी प्रतिमानाचा वापर केलेला नाही. परंतु आर्थिक सुधारणा बरोबर गांधीवादी सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.
4. गांधीजींनी सर्वसामान्याच्या हितासाठी तसेच त्याच्या रक्षणासाठी स्वदेशीचा वापर होणे गरजेचे आहे हे एक चिंतन आहे यावर त्यांनी भर दिला.
5. गांधीवादी आर्थिक व्यवस्थेत मानव विकासाचे अंतिम लक्ष्य प्राप्त करण्यासाठी सर्वोदय या विचाराला त्यांनी महत्व दिले आहे. सर्वोदय या तत्वाचा प्रत्यक्ष व्यवहारात वापराला त्यांनी महत्व दिले त्यामुळे वर्गविहिन, जातीविहिन, शोषणमुक्त असा एक समाज निर्माण होईल अशी त्यांची भावना होती.
6. गांधीवादी विकासाची संकल्पना अधिक व्यापक आहे यात व्यक्तीचा केवळ आर्थिक विकासच नाही तर सामाजिक आणि मानवी विकासावर अधिक भर देते व संतुलित आर्थिक विकासाची अपेक्षा करते.

**संदर्भग्रंथ सूची :**

- पटेल, आशा (2005). ग्रामीण विकास का गांधीवादी दृष्टिकोन. डिसेंट बुक्स.
- गांधी, एम. के. (1937). हरिजन.
- गांधी, एम. के. (1941). रचनात्मक कार्यक्रम. नवजिवन प्रकाशन गृह.
- घोष, बी. एन. (2006). गांधीवादी राजनैतिक अर्थशास्त्र : सिध्दांत अभ्यास और निती. एसनेट पब्लिशींग लिमिटेड.
- भोले, एल. एम. (सं.) (2000). गांधीवादी सामाजिक आर्थिक विचार पर निबंध. शिप्रा प्रकाशन.
- मधुकर, बी. और राव, सुर्यप्रकाश (2008). अहिंसा का अर्थशास्त्र, प्रौद्योगिकी और पर्यावरण : गाधींजी की प्रासंगिकता गांधीवादी दर्शन और मानव विकास. कनिष्क प्रकाशन.